**दिवाणी चौकशी अर्ज क्र.३९/२०२२ मध्ये नि.क्र.१ वरील आदेश.**

**शगुफ्ता मिया अहमद नाडकर.**
**विरुध्द**
**कोणीही नाही.**

(सीएनआर क्र. **MHTH** 13000–13000-646-2022.)

०१. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या तरतुदी प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेल आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार यांचे पती मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर हे दिनांक ०८/१०/२०२१ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने रानवली येथे मयत झाले आहेत. मयत मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे त्यांच्या नावे वारस दाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करुन मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. या अर्जाच्या कामी अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्या दाखल साक्षीदार म्हणून नि.क्र.११ कडे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०४. अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची सत्यप्रत नि.क्र.१२ कडे

दाखल केली आहे. अर्जदार यांनी लग्नाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत नि.क्र.१३ कडे दाखल केली आहे. अर्जदार यांनी दिनांक २६/११/२०२२ रोजीच्या दैनिक ''सागर'' या वृत्तपत्रामध्ये मयत मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर यांच्या मृत्यू बाबत नि.क्र.१४ ची नोटीस प्रसिध्द केली. सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीमध्ये न्यायालयात कोणीही हरकत उपस्थित केली नाही. तसेच मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर हे मयत झाल्याबाबत त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची सत्यप्रत नि.क्र.१५ कडे दाखल केली आहे. अर्जदार यांनी नि.क्र.१६ ला पुरशिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

०५. अर्जदाराच्या पुराव्यानुसार अर्जदार हेच मयत मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर यांचे कायदेशीर वारस होय. त्यांच्या पुराव्यावरुन व मुस्लीम वारसा कायदयातील तरतुदी विचारात घेवून असे निदर्शनास येते की, मयत मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर यांचे वारस म्हणून अर्जदार शगुफ्ता मिया अहमद नाडकर ही पत्नी म्हणून कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना सदरचा वारस दाखला कुवेत येथील ३ बी जनरल ट्रेडींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्ट कं. डब्ल्यु. एल. एल. या कामासाठी देण्यात येतो. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे सदरचा अर्ज

मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: **आदेश** ::

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार ही मयत मिया अहमद अब्दुल वहाब नाडकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यात येत आहे.

०३. अर्जदार यांनी न्यायालयीन मुद्रांक भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Sonali Dilip Javalgekar
Digitally signed by Sonali Dilip Javalgekar
Date: 2023.04.17 17:21:30 +0530

श्रीवर्धन. ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक – १३/०४/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

..